सं.के.नं.३१२/२०२२
नि.क्र.२७/क च्या पुढे...

फिर्यादी तर्फे साक्षीदार क्र. १ याची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**<u>फिर्यादी तर्फे सरतपास शपथेवर वकील श्री. मोहन थळी यांच्याद्वारे पुन्हा सुरु. .</u>**

६. मी खाली पडल्याने माझ्या डाव्या खांदयाला व उजव्या हाताच्या मधल्या बोटाला मुका मार लागला. तेव्हा तेथे माझी पत्नी हेमलता परशुराम कोळी ही आली. त्यानंतर आरोपी क्र. ३ रविंद्र वासुदेव कोळी तेथे आला. त्याने म्हटले की, ''भडव्या तू स्वत:ला काय समजतो'' असे म्हणून मला शिवीगाळ केली व जीवे मारण्याची धमकी दिली. तेव्हा माझी पत्नी हेमलता धावत आली. तिने आरोपींना शांत राहण्याचा व समजावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपी क्र. १ राजीव रविंद्र कोळी हा ''आम्ही काहीही करु, तुम्हाला काय करायचे आहे ते करा,'' असे म्हणाला.

७. त्यामुळे मी घटनेची तक्रार दाखल करण्यासाठी मोरा पोलीस ठाण्यात गेलो होतो. तेथे पोलीसांनी माझी तक्रार ऐकून घेऊन कॉन्स्टेबल बळीराम चव्हाण यांना घटनास्थळावर पाठविले. त्यामुळे मी व चव्हाण घटनास्थळावर आलो असता, तिनही आरोपी तेथे हजर होते. त्यातील आरोपी रविंद्र वासुदेव कोळी याने शिवीगाळ केली व म्हणाला की, प्रॉपर्टी काय एकटयाची आहे का? त्यावेळी मी माझा मोबाईल चालू करुन व्हीडीओ घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा आरोपी रविंद्र म्हणाला की, ''बायकोची व्हीडीओ काढ जा नागटी, वीस वर्ष भाडा खाताव साल्यांनो, म्हातारा झाला तरी समज नाय,'' असे म्हणाला. त्यानंतर बळीराम चव्हाण यांनी मला व तीन्ही आरोपींना घेऊन पोलीस ठाण्यात आणले. तेव्हा रविंद्र याने चोर साल्यांनो, असे म्हटले. पोलीस ठाण्यात गेलो असता, आरोपी रविंद्र याने सांगितले की, सरीता दिपक कोळी व संदीप दिपक कोळी यांचे विरुद्ध सुद्धा तक्रार दाखल केली आहे, त्यांना घेऊन या. त्यानंतर मी एकटाच घटनास्थळावर वापस आलो. तेथे राजीव महेंद्र कोळी व मयुर रविंद्र कोळी हे उपस्थित होते. त्यांनी मला पाहताच शिवीगाळ सुरु केली. त्यामुळे मी परत व्हीडीओ काढण्याचा

प्रयत्न केला. तेव्हा आरोपी मयुर हा माझे अंगावर आला व माझा मोबाईल हिसकून घेतला व मला लोटून दिले. तसेच माझा मोबाईल फोन त्याने रस्त्यावर कुठेतरी फेकून दिला. त्यामुळे मी पुन्हा पोलीस ठाण्यात गेलो व घडलेला प्रकार सांगितला. तेव्हा पोलीसांनी अदखलपात्र गुन्हयाची नोंद करुन घेतली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मला व तीनही आरोपींना चौकशीसाठी पोलीस ठाण्यात बोलाविले. दुसऱ्या दिवशी मी पोलीस ठाण्यात हजर झालो. परंतु तीनही आरोपी जाणीवपुर्वक पोलीस ठाण्यात हजर राहीले नाहीत. त्यामुळे पोलीसांनी न्हावाशेवा पोलीस आयुक्तांसमक्ष हजर राहण्याबाबत समन्स काढले. त्यानुसार मी व तीनही आरोपी न्हावाशेवा पोलीस आयुक्तांसमक्ष हजर झालो. तेथे आयुक्तांनी माझे कडून व तिनही आरोपींकडून बंधपत्र लिहून घेऊन आमची सुटका केली.

८. त्यानंतर काही दिवसांनी आरोपी राजीव माझेकडे आला व तडजोडीची बोलणी करायची आहे असे म्हटले. ती बोलणी दोनमहिन्यांपर्यंत चालू होती. तेव्हा मला समजले की, आरोपी रविंद्र याने माझे विरुद्ध न्यायालयात खाजगी तक्रार दाखल केली आहे. त्यामुळे आरोपींची भेट घेऊन बोलणी चालू असताना तक्रार का दाखल केली, असे विचारले. तेव्हा आरोपींनी आम्ही तडजोड करणार नाही, तुला काय करायचे असेल ते कर असे म्हटले. त्यानंतर मी पोलीस ठाण्यात जाऊन आरोपींविरुद्ध काय कार्यवाही केली याची चौकशी केली. तेव्हा पोलीसांनी न्यायालयात खाजगी तक्रार दाखल करण्यास सांगितले. त्यामुळे मी सदर प्रकरण दाखल केले आहे. सदर फिर्यादवर माझी सही असून मजकूर बरोबर आहे.

**<u>आरोपीच्या वकीलांच्या तोंडी विनंती वरुन उलटतपास तहकुब.</u>**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

उरण,
दिनांक –१०/११/२०२५

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)